महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन
प्राधिकरण अधिनियम-२००५.
नदी खोरे अभिकरणासाठी विशेष
निमंत्रितांच्या नेमणूका करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांकः नदीजो-२००७/(१७७/०७)जसंअ.
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांकः १३/०३/२००८.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता कृषी विषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१८ राजपत्रात अधिसूचित करण्यात आला आहे. या नियमातील कलम-४ (१) (घ) मध्ये पुढील तरतूद करण्यात आलेली आहे.

"प्राधिकरणाला धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यास सहाय्य करण्याकरिता प्रत्येक नदी खोरे अभिकरणाच्या क्षेत्रातून एक याप्रमाणे विहित केल्यानुसार पाच विशेष निमंत्रित जे अभियांत्रिकी, शेती, पिण्याचे पाणी, उद्योग, कायदा, अर्थशास्त्र, वाणिज्य, वित्त व्यवस्था किंवा व्यवस्थापन यांच्याशी संबंधित समस्यांचे पुरेसे ज्ञान, अनुभव असलेले किंवा त्या संबंधातील क्षमता शाबीत केलेली असेल, असे असतील" सन २००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम २ (प) नुसार "नदी खोरे अभिकरण" याचा अर्थ नदी खो-यामध्ये कार्यरत असलेल्या पाच पाटबंधारे विकास महामंडळांपैकी कोणतेही एक असा आहे. त्यानुसार ५ नदी खोरे अभिकरणामधून विशेष निमंत्रितांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रत्येक नदी खोरे अभिकरणांमधून एक असे एकूण ५ विशेष, निमंत्रित महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर नियुक्त करणे अभिप्रेत आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक महामंडळातून एक याप्रमाणे पुढील प्रमाणे महामंडळनिहाय तज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे - डॉ. सुधीर भोंगळे
२) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद - श्री. वाय.आर.जाधव
३) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर - ॲड. मधुकर किंमतकर
४) तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव - प्रा. आर.डी.राणे
५) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ,ठाणे - डॉ.एस.एस.मगर

सदर निमंत्रितांचा कालावधी तीन वर्षाचा असेल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २००८०३१३१६३६२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र.बा.इंगळे )
शासनाचे कक्ष अधिकारी

प्रत,

मा.मंत्री, जलसंपदा (कृखोवि वगळून) यांचे स्वीय सहायक
मा.मंत्री,जलसंपदा (मकृखोविम) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक
मा. सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक
मा. सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक
सचिव,महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,मुंबई
प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग,मंत्रालय,मुंबई
सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव, ऊर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय,मुंबई
कार्यकारी संचालक,महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव
कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ,ठाणे
डॉ. सुधीर भोंगळे,१० योजनबंधा सोसायटी,पौड रोड,शिवतिर्थ नगर,कोथरुड,पुणे ४११ १०२.
श्री. वाय.आर.जाधव, रामायण, विश्वास नगर,नांदेड-४३१६०२.
ॲड. मधुकर किंमतकर, तज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर
प्रा. आर.डी.राणे, ८, जीवराम नगर, जळगांव- ४२५००१
डॉ.एस.एस.मगर, माजी कुलगुरु, डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली, ह.मु.१७,रुणानुबंध सोसायटी,औध, पुणे-४११ ००७
जसंअ कार्यासन संग्रहार्थ.